10 पत

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District** (जिल्हा): नांदेड **P.S.**(ठाणे): नांदेड ग्रामीण

**FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0719 **Year** (वर्ष): 2025

**Date and Time of FIR** (प्र. ख. दिनांक आणि वेळ):28/07/2025 21:54

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) **Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना):

1. **Day**(दिवस): बुधवार **Date From** (दिनांक पासून): 07/05/2025
**Time Period** (कालावधी): पहर 7 **Date To** ( दिनांक पर्यंत): 07/05/2025
**Time From** (वेळेपासून): 19:30 बजे
**Time To** (वेळेपर्यंत): 20:00 बजे

(b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):
**Date** (दिनांक ): 28/07/2025 **Time** (वेळ): 21:32 बजे

(c) **General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ ):
**Entry No.** (नोंद क्र.): 040
**Date & Time** (दिनांक आणि वेळ): 28/07/2025 21:32 बजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): लेखी

5. **Place of Occurrence** (घटनास्थळ):

1.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):
उत्तर, .5 किमी **Beat No.** (बिट क्र.):

(b) **Address** (पत्ता): पोलीस स्टेशन नादेड ग्रा

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):
**Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे नाव):
**District(State)** (जिल्हा(राज्य)):

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): माधूरी अजयराव यावलीकर

(b) **Father's Name** (वडील चे नाव) : अजयराव

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1988

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाप्रवि नांदेड ,लाप्रवि नांदेड ,नांदेड ग्रामीण,नांदेड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाप्रवि नांदेड ,लाप्रवि नांदेड ,नांदेड ग्रामीण,नांदेड,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-8379089710

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | ज्ञानेश्वर भिमराव तिडके | | वडील का नाम : भिमराव | 1. माळाकोळी, लोहा ,माळाकोळी , नांदेड,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| **S.No.** (अ.क्र.) | **UIDB Number** (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

दिनांक 28/07/2025
सरकार तर्फे फिर्याद
मी माधुरी अजयराव यावलीकर वय 37 वर्ष व्यवसाय - नौकरी, पद- पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड मो.नं.8379089710

समक्ष पोलीस स्टेशन नांदेड ग्रामीण येथे हजर येवुन लेखी फिर्याद देते की, तक्रारदार नामे शेख अजिज शेख जब्बार वय 34 वर्ष व्यवसाय-रिक्षा चालक रा.आलुकांदा मार्केट बौंडारा बायपास नादेड ता.जि.नांदेड यांनी ला.प्र.वि. नांदेड येथे दि.07/05/2025 रोजी लेखी तक्रार दिली की, मी सन 2021 मध्ये फार्मा कंपणीचे मॉडल नंबर 6055 चे ट्रॅक्टर क्रमांक MH 26 BQ 9282 प्रताप खुराणा यांचे मे. अमन ट्रॅक्टर वसमत फाटा, नांदेड हिंगोली रोड अर्धापुर जि. नांदेड येथुन खरेदी केले होते. त्यामुळे सदर ट्रक्टर शोरुमचे मालक प्रताप खुराणा हे माझे सन 2021 पासून ओळखीचे आहेत.

ऑगस्ट 2022 मध्ये माझे ट्रक्टर क्रमांक MH 26 BQ 9282 मौजे मोहनपुर वाहेगाव ता.जि. नांदेड येथे असतांना प्रताप खुराणा यांनी सदर ट्रक्टर माझे संमती शिवाय काहीही कारण नसतांना घेवुन गेले. त्यानंतर मी प्रताप खुराणा यांना माझे ट्रॅक्टर परत देण्यासाठी वारंवार विनंती केली परंतु त्यांनी माझे ट्रॅक्टर मला परत दिले नाही. त्यामुळे मी त्यांचेवर कायदेशीर कार्यवाही होण्यासाठी दि. 26/08/2023 रोजी पोलीस स्टेशन नांदेड ग्रामीण येथे तक्रारी अर्ज दिला होता. सदर अर्जावर कार्यवाही झाली नसल्यामुळे दि. 04/03/2025 रोजी पोलीस अधीक्षक नांदेड यांचेकडे मी परत नविन तक्रारी अर्ज दिला आहे.

मी दि.04/03/2025 रोजी पोलीस अधीक्षक, नांदेड यांचेकडेस दिलेला तक्रारी अर्ज नांदेड ग्रामीण पोलीस स्टेशनला चौकशी कामी पाठविला असुन त्या अर्जाची चौकशी कामी पोलीस कर्मचारी तिडके यांचेकडे असल्याची मला माहीती मिळाली. सदर अर्जावर काय कार्यवाही झाली याची माहीती घेण्यासाठी मी श्री.तिडके यांना दि. 24/04/2025 रोजी भेटला. त्यावेळी मी त्यांना माझे तक्रार अर्जावर कायदेशीर कारवाई करण्याची विनंती केली. त्यावेळी ते मला म्हणाले की, "पैसे देवुन साहेबांना भेटाव लागते, तरच कारवाई होते.नाहीतर असेच अर्ज पडुन राहतात" असे म्हणुन त्यांनी माझेकडे 12,000/- बारा हजार रुपयाची मागणी केली.त्यावेळी पैसे दिले नाहीतर माझे अर्जावर कारवाही करणार नाहीत या भिती पोटी मी त्यांना होकार दिला व नंतर येतो म्हणुन सांगितले. वगैरे मजकुराची तक्रार ला.प्र.वि. प्रभारी अधिकारी नांदेड यांचेकडे दि. 07/05/2025 रोजी दिली. प्रभारी अधिकारी यांचे निर्देशावरुन सदर तक्रारीचे अनुषगांने आम्ही दोन शासकीय पंच बोलावून घेतले व त्याना तक्रारदार शेख अजिज यांनी दिनांक 07/05/2025 रोजी दिलेली लेखी तक्रार पंचाना वाचण्यास दिली. पंचानी तक्रार वाचुन तक्रारदार शेख अजिज यांनी दिलेली लेखी तक्रार व तोंडी सांगितलेली तक्रार एकसारखीच असल्याची खात्री करुन सदर तक्रारीवर दोन्ही पंचानी सहया केल्या.
त्यानंतर तक्रारदार शेख अजीज शेख जब्बार यांचे तक्रारीची पडताळणी करण्याचे सर्वानुमते ठरवण्यात आले. त्यानंतर दिनांक 07/05/2025 रोजी आम्ही,तक्रारदार,दोन्ही पंच व सापळा पथकातील सदस्य पोकॉं कणसे, पोकॉं जाधव, पोकॉं/गोरपल्ले, चापोहेकॉं/प्रकाश मागुलवार असे तक्रारदार यानी आणलेला ऑटो वाहन क्र. एम.एच. 26.बि.डी.5743 व माझी फोरविलर गाडी क्रमांक एम.एच 27 बी.ए 8108 या दोन्ही खाजगी वाहनाने ला.प्र.वि कार्यालय नांदेड येथून रवाना झालो.

त्यानंतर तक्रारदार व पंच यांना लोकसेवक तिडके यांची भेट घेणे करीता पोलीस स्टेशन नांदेड ग्रामीण येथे पाठविले होते. तरी तक्रारदार व पंच लोकसेवक तिडके याँची भेट घेवुन परत आले नंतर त्यांना विचारणा केली. त्यावेळी तक्रारदार यांनी सांगितलेली हकिकत तसेच डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर मधील संभाषण यावरुन लोकसेवक तिडके यांनी तक्रारदार यांच्या अर्जातील गैरअर्जदार व्यक्तीवर चोरीचा गुन्हा दाखल करून देण्यासाठी तक्रारदार

यांचेकडे "काही तरी देवुन घेवुन काम कराव लागत............किती पाच लाखाच आहे का ट्रक्टर...... तरा तर गोंधळच झालाय, एक तरी लागल, एक, तुझ्यासाठी परफेक्ट काम करायला........परफेक्ट काम करायला सगळ व्यवस्थीत म्हणजे गुन्हा दाखल करण................ एफ.आय.आर.मध्ये सगळ, एफ.आय.आर.म्हणजे काम तिकडच्या तिकड इंन्शूरन्स होउन जाते...... करतो दोन ते तीन जणांना दयावाव लागते............ .. साहेबाला गुन्हा दाखल करायला अँडजेस्टमेंन्ट कराव लागत. सगळे लफडे रहातात ईथे......तु आमचे गावात न आहेस, तुझ्यामुळ साहेबाला शब्द टाकतो, साहेब काय म्हणतात काय नाही.? ..... गुन्हा दाखल झाला की पैसे दिल की, अध्र्या घंटयात एफ.आय.आर.निघुन जाते, जावु दयाना, टेंन्शन मिटुन जाते"........असे म्हणुन लाच मागणी केल्याचे निश्पन्न झाले होते.

तरी वरील नमुद पडताळणी दरम्यान लोकसेवकाने साहेबांना पैसे द्यावे लागतात असे सांगीतले त्यामुळे वरिष्ठाचा यात सहभाग आहे का? हे पडताळणी करणे गरजेचे होते म्हणुन दि.08/05/2025 रोजी पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन नांदेड ग्रामीण यांची पडताळणी करण्याचे नियोजीत केले. परंतु दिनांक 08/05/2025 रोजी तक्रारदार व पंच क्रमांक 1 असे पोलीस स्टेशन नांदेड ग्रामीण येथे पोहचल्यानंतर लोकसेवक तिडके मिळून न आल्याने तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईल क्रमांक वरून लोकसेवक तिडके यांचे मोबाईल क्रमांकावर फोन करून त्यांचे कामा संबंधाने बोलले. तरी कॉल करतांना तक्रारदार यांनी कॉल रेकॉर्डींग चालु केल्या बाबतचा संदेश लोकसेवक तिडके यांना गेल्याने त्याने तक्रारदार यांना उडवा उडवीचे उत्तरे दिले. त्यामुळे तक्रारदार यांनी पो.नि. चिंचोलकर यांची भेट न घेताच सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत आले.

त्यानंतर दिनांक 14/05/2025 रोजी आम्ही, पंच, तक्रारदार व सापळा पथक असे पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन नांदेड ग्रामीण यांची पडताळणी करण्या करता तक्रारदार व पंच क्र.1 यांना पाठवले असता लोकसेवक तिडके हे पोलीस स्टेशन नांदेड ग्रामीण येथे भेटले. त्यांनी तक्रारदार व पंच क्रमांक 1 वाघमारे यांना पो.नि. चिंचोलकर यांचेकडे घेवून गेले असता त्यांनी तिडके यास तक्रारदार यांचे ट्रक्टर चोरीच्या अर्जाबाबत विचारपुस केली आणि म्हणाले की, हे वरीष्ठ अर्ज आहे. यात गुन्हा दाखल करण्यासाठी माझी सही लागत नाही. तुम्ही पी.एस.ओ यांच्या कडे जा आणि गुन्हा दाखल करा असे कळविले. त्यानंतर आम्ही, दोन्ही पंच व सापळा पथक यांचेसोबत चर्चा करून फक्त लोकसेवक तिडके यांचेवर सापळा कार्यवाही करण्याचे सर्वानुमते ठरविले.

दिनांक 19/05/2025 रोजी आम्ही तक्रारदार,दोन पंच व सापळा पथक असे ला.प्र.वि. कार्यालय नांदेड येथे हजर आलो. त्यानंतर आम्ही लोकसेवक तिडके यांचे विरूध्द लाचेचा सापळा लावण्याचे ठरले. आम्ही तक्रारदार यांना सापळा कार्यवाहीत एक लाख रूपये लोकसेवक यांना देण्याकरिता हजर करण्यास सूचना दिले. तेव्हा तक्रारदार यांनी सांगितले की, माझेकडे 1 लाख रूपयाची जोड होत नाही. माझेकडे फक्त 10,000/- रू आहेत. त्यावरून सर्वानूमते 10,000/- रू देवून सापळा कार्यवाही करण्याचे ठरविले. त्यानंतर तक्रारदार व पंच क्रमांक 1 यांना लोकसेवक तिडके यांची भेट घेण्यासाठी अँथ्रॉसिन पावडर लावलेले 10,000/- रूपये घेवुन पोलीस स्टेशन नांदेड ग्रामीण येथे डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालू करून रवाना केले. सापळा पथक त्यांचे मागे रवाना होवून पोलीस स्टेशन नांदेड ग्रामीण परीसरात थांबुन राहीलो . तक्रारदार व पंच क्रमांक 1 हे यांनी सापळा पथकास कोणताही इशारा न करता परत आले. त्यानंतर तक्रारदार व पंच क्रमांक 1 सापळा पथक थांबण्याच्या नियोजीत ठिकाणी परत आले. तेव्हा तक्रारदार यांनी लोकसेवक तिडके पोलीस स्टेशनला हजर नसल्याचे सांगीतले.

दि.20/05/2025 रोजी पुन्हा सापळा कार्यवाही करीता तक्रारदार व पंच क्र.1 यांना पोलीस स्टेशन नांदेड ग्रामीण येथे पाठविले. तेव्हा तेथे लोकसेवक तिडके पोलीस स्टेशनला हजर नव्हते. त्यानंतर तक्रारदार यांना लोकसेवक तिडके यांचे मोबाईल वर संपर्क करण्यास सांगतीले, तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईल क्रमांक 9665597724 वरून लोकसेवक तिडके यांचे मोबाईल क्रमांक 9823471777 वर फोन केला असता त्यांचे मोबाईल क्रमांक बंद होते. त्यामुळे सदर दिवशी कार्यवाही होवु शकली नाही.

दिनांक 21/05/2025 रोजी तक्रारदार शेख अजीज शेख जब्बार यांना लाप्रवि,नांदेड कार्यालय येथे हजर येणे करीता त्यांचे मोबाईल नंबर 9665597724 वर संपर्क केला असता त्यांचा मोबाईल क्रमांक बंद होता. तक्रारदार यांचे वकील लाप्रवि,नांदेड कार्यालय येथे हजर आले व तक्रारदार यांचे मार्फतीने अर्ज दिला, त्यात पोहेकॉ/ज्ञानेश्वर भिमराव तिडके ब.नं. 1126 ने.पो.स्टे.नांदेड ग्रामीण ता.जि.नांदेड यांच्या विरोधात लाप्रवि, कार्यालय येथे दिलेली फिर्याद खोटी असल्या कारणाने परत घेणे बाबत व कसलिही कारवाई न करता निकाली काढणे बाबत नमुद केले आहे. तसेच मा.महासंचालक, अँन्टी करप्शन ब्युरो, वरळी, मुंबई यांच्या नावाने तक्रारदाराने 100 रूपये बॉन्डवर नोटरी करून दिलेले शपथपत्र व तक्रारदार यांच्या आधारकार्डची छायांकीत प्रत दिली होती. त्यानंतर आम्ही खात्री करण्या करीता तक्रारदार यांच्या मोबाईलवर संपर्क केला असता त्यांचा मोबाईल बंद असल्याचे दिसुन आले.

आम्ही दिनांक 21/05/2025 , दिनांक 22/05/2025 व दिनांक 26/05/2025 रोजी तक्रारदार यांचा

त्यांचे रहाते घरी नांदेड येथे शोध घेतला असता तक्रारदार मिळुन आले नाहीत. तक्रारदार यांना लाप्रवि,कार्यालय, नांदेड येथे हजर येणे बाबत समजपत्र तक्रारदार यांच्या पत्नीकडे देण्यात आले होते. परंतु आज पावेतो तक्रारदार लाप्रवि,कार्यालय,नांदेड येथे हजर आलेले नाहीत.

एकंदरीत सर्व कार्यवाहीमध्ये दिनांक 07/05/2025 रोजी लोकसेवक तिडके यांची लाचमागणी पडताळणी केली त्यामध्ये लोकसेवक तिडके यांनी तक्रारदार यांच्या तक्रारी अर्जावर कार्यवाही करुन गुन्हा दाखल करण्या करीता लाचेची मागणी केल्याचे स्पष्टपणे निष्पन्न झाले आहे. त्याचबरोबर तक्रारदार यांचा शोध घेतला असता ते मिळुन येत नसल्याने नमुद लाचमागणी पडताळणी कार्यवाहीमध्ये आम्ही सरकारतर्फे फिर्यादी होवुन लोकसेवक तिडके यांचेविरुध्द सरकारतर्फे तक्रार देवुन गुन्हा दाखल करण्याची परवानगी मिळणे करीता मा.वरिष्ठाना अहवाल सादर केला होता.

तरी मा.वरिष्ठानाकडुन परवानगी प्राप्त झाल्याने आज रोजी लोकसेवक ज्ञानेश्वर भिमराव तिडके यांचे विरुध्द लाचलुचपत प्रतिबंध अधिनियम 1988 चे कलम 7, 7A अन्वये कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद मी वाचून पाहिली, ती मी सांगितल्या प्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष ही फिर्याद दिली सही

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):
omkant anandrao chincholkar(I (Inspector)) / DGPOACM8201

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): **or** (किंवा)

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** omkant anandrao ch
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** DGPOACM8201